गुरुवार दि. १२ जून २०२५ । वर्ष -१३ । मुंबई

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत । अंक

Follow Us on Social Media

www.theglobaltimes.org

EPaper

द ग्लोबल टाइम्स

मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

Register No. : RNI - MAHMAR /2012/44621



# विवेकानंदमध्ये ए.आय. आणि रोबॅटिक्स या अभ्यासक्रमांचे उदघाटन

**कोल्हापूर : विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील संस्कार केंद्राच्या ए.आय. आणि रोबॅटिक्स या नवीन अभ्यासक्रमाचे उदघाटन पालकमंत्री प्रकाश आबिटकर आणि प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अभ्यासक्रम पुस्तिकेचे वाटप विद्यार्थी व शिक्षकांना करण्यात आले.**



ए.आय. आणि रोबॅटिक्स या ज्ञानक्षेत्राचा जगभरात वेगाने विस्तार होत आहे. आज या तंत्रज्ञानाच्या मदतीने जग क्रांतीकारक वाटचाल करीत आहे. अगदी शेताच्या बांधापासून चांद्रयान मोहिमेपर्यंत सर्व प्रकारची कामे सुलभ होत आहेत. या ज्ञानशाखेची माहिती व ज्ञान विद्यार्थ्यांना उपलब्ध करण्यासाठी ए.आय. आणि रोबॅटिक्स या नवीन अभ्यासक्रमाची सुरुवात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने करुन महाराष्ट्राच्या शैक्षणिक चळवळीत आघाडी प्राप्त केली आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची १०७व्या जयंती समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून नाम. आबिटकर बोलत होते. संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. येथील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनात हा जयंती समारंभ हजारो गुरुदेव कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे यांनी करुन दिली. यावेळी डॉ. एकनाथ आळवेकर, डॉ. डी. आर. तुपे, प्रा. हवालदार, प्रा. दिव्या बाबर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

संस्थेच्यावतीने नाम. प्रकाश आबिटकर यांचा सत्कार करण्यात आला. सिरपचे अधिकारी रोहित शिंदे यांचा विशेष सत्कार करण्यात आला तसेच अतिरिक्त आयुक्त संजय गुरव यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या समाधीला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्था सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, कोल्हापूर जिल्हा विभाग प्रमुख श्रीराम साळुंखे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, श्रीमती श्रध्दा गुरगुट्टे, संस्थेचे पदाधिकारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. आभार संस्था सहसचिव एस. एम. गवळी यांनी मानले. सुत्रसंचालन प्रा. डॉ. कविता तिवडे व प्रा. गीतांजली साळुंखे यांनी केले.